# फिर्याद

रावेर पो.स्टे.
दि.२०/०१/२०२६

मी योगेश गंगाधर ठाकूर, वय ४७ वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव. मो.नं.९७०२४३३१३१

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगाव येथे पोलीस उप अधिक्षक पदावर कार्यरत आहे. दि.१६.१०.२०२४ रोजी तक्रारदार श्री.रमेश भुतेकर, वनरक्षक यांनी आमचेशी फोनद्वारे संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवका विरुध्द लाचेसंबधी तक्रार असुन ते १७.०० वाजेचे सुमारास अहिरवाडी गावाचे बाहेरील रस्त्यावर असलेल्या देशी दारुचे दुकाना जवळील पुलाजवळ भेटणार असल्याचे कळवले होते. त्याप्रमाणे आम्ही, पंच उपलब्ध करुन देणे बाबत आयुक्त, समाजकल्याण विभाग जळगाव यांना पत्र पाठवले होते. त्यांनी श्री.विकास गोविंदा वाणी, कनिष्ठ लिपीक व श्री.सुर्यभान राजाराम पाटील, अधिक्षक यांना पंच म्हणुन नियुक्त केले होते.

त्यानंतर आम्ही, वर नमुद पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार श्रेणी पोउपनि/दिनेशसिंग पाटील, पोकॉ/राकेश दुसाने असे सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह शासकिय वाहन क्रं.MH 19 EA 6021 वरील चालक श्रेणी पोउपनि/सुरेश पाटील यांचेसह १५.०० वाजेचे सुमारास ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयातुन रवाना होवुन नशिराबाद,भुसावळ,फैजपुर,सावदा मार्गे तक्रारदार भुतेकर यांनी कळवले प्रमाणे अहिरवाडी गावाचे बाहेरील रस्त्यावर असलेल्या देशी दारुचे दुकाना जवळील पुलाजवळ १६.५० वाजेचे सुमारास पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार भुतेकर यांची भेट घेतली असता त्यांचे पुर्ण नाव, पत्ता श्री.रमेश अरुण भुतेकर, वनरक्षक, तत्कालीन नेमणुक वनक्षेत्र रावेर,यावल वनविभाग,जळगाव रा.गोपाल नगर, स्टेशन रोड, रावेर, जि.जळगाव असे सांगीतले होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार भुतेकर यांना सापळा पथका समक्ष त्यांचे तक्रारी बाबत विचारपुस करता त्यांनी सांगितले की ते वनरक्षक जिन्सी, वनक्षेत्र, रावेर यावल वनविभाग,जळगाव येथे कार्यरत असतांना वनपरिक्षेत्र अधिकारी संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन यावल यांनी दि.०५.०९.२०२४ व दि. ०६.०९.२०२४ रोजी त्यांचे कार्यक्षेत्रातील रोपवनातील निंदणीचे कामाची तपासणी केलेली होती. त्या दरम्यान दि.०५.०९.२०२४ रोजी सकाळी ९.१२ वाजेचे सुमारास तक्रारदार यांना श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर यांनी व्हॉट्सॲप कॉल करुन बिट तपासणी दरम्यान कागदपत्र वाचुनच सहया करा, बाकीचे मी तुमचे वनपाल, राजेद्र सरदार यांना सांगतो असा निरोप दिला होता.

त्याप्रमाणे दि.०७.०९.२०२४ रोजी सकाळी ७.२१ वाजेचे सुमारास राजेंद्र सरदार, वनपाल यांनी तक्रारदार भुतेकर यांना व्हॉट्सअप कॉल करुन ''वनरक्षक जिन्सी ठिकाणचे तपासणी पंचनाम्यामध्ये नियतक्षेत्र जिन्सी कक्ष क्र.१० यातील भरीव वनिकरण कार्यक्रम रोपवन वर्ष २ रे क्षेत्र २५ हेक्टर यात गवत दिसत आहे असा उल्लेख आहे. सदर रोपवनामध्ये निंदणी कामाचा शासकिय निधी खर्च झालेला आहे. निंदणीचे कारणा वरुन तुम्हाला निलंबीत केल्यास निंदणी कामाचा निधी खर्च केला म्हणून श्री. बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर व सदर कामाचे खर्चाचे व्हाउचर तयार केले म्हणुन मी असे आम्ही दोन्ही अडचणीत येउ शकतो. म्हणुन श्री.बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर यांनी निरोप दिला आहे की, सदर भागाचे वनरक्षक म्हणुन तुम्ही १५ हजार रुपये दिल्यानंतर ते सदर पैशांमधुन बिट तपासणीचा अहवाल त्यांचे स्तरावर मॅनेज करणार आहेत. अहवाल मॅनेज झाल्यानंतर तुमच्यावर निलंबनाची कारवाई होणार नाही'' असे सांगुन तक्रारदार भुतेकर यांचे व्हॉट्सअपवर खाजगी इसम दिपक तायडेचा फोन पे नंबर पाठवुन, त्यावर १५ हजार रुपये पाठवण्यास सांगीतले होते.

तक्रारदार भुतेकर यांचेकडे फोन पे ॲप नसल्याने त्यांनी त्यांचे फोन मधील योनो ॲपद्वारे त्यांचा मित्र विकास गायकवाड याचे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा खंडाळा येथील अकाउंटवर १३,२५०/— रुपये ट्रान्सफर करुन, सदरचे पैसे हे त्याचे फोन पे द्वारे दिपक तायडे याचा ७००००७४२४७ मोबाईल नंबरला लिंक असलेल्या फोन पे वर पाठवण्यास सांगीतले.त्याप्रमाणे विकास गायकवाड यांनी स्वत:चे फोन पे ॲप वरुन दिपक तायडे याचे फोन पे ॲपवर १३,२५०/—रुपये ट्रान्सफर केल्याचा स्क्रिनशॉट तक्रारदार भुतेकर यांचे व्हॉट्सॲपवर पाठवला होता. त्यानंतर दि.०८.०९.२०२४ रोजी तक्रारदार भुतेकर यांनी राजेंद्र सरदार, वनपाल यांचे शासकिय निवासस्थानी अहिरवाडी येथे जावुन त्यांना उर्वरित १,७५०/—रुपये रोख दिले होते.

अशा प्रकारे राजेंद्र सरदार,वनपाल यांनी तक्रारदार भुतेकर यांचे जिन्सी कार्यक्षेत्रातील रोपवनामध्ये निंदणी कामाचा तपासणी अहवाल मॅनेज करुन,त्यांचे निलंबन होवु न देण्याचे मोबदल्यात तक्रारदार

भुतेकर यांचेकडुन खाजगी दिपक तायडे याचे फोन पे वर १३,२५०/—रुपये व स्वत: १,७५०/—रुपये रोख असे एकुण १५,०००/— रुपये घेवुन देखील वनसंरक्षक (प्रादेशिक) धुळे यांनी तक्रारदार भुतेकर यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील जिन्सी रोपवनातील निंदणीचे काम न केल्याचा ठपका ठेवुन दि.१२.०९.२०२४ रोजी निलंबन केले होते.

त्यानंतर दि.१५.०९.२०२४ रोजी तक्रारदार भुतेकर व राजेंद्र सरदार, वनपाल यांची रावेर कार्यालयात भेट झाली. तेव्हा त्यांनी तक्रारदार भुतेकर यांना ''तुला निलंबनातून मुक्त करण्यासाठी मी वरिष्ठांना सांगून प्रयत्न करतो, त्यासाठी तुला पैसे द्यावे लागतील'' असे सांगितले असता त्यांनी ''किती पैसे द्यावे लागतील? अशी विचारणा केली. त्यावर राजेंद्र सरदार,वनपाल यांनी ''मी नंतर सांगतो, तू तयारीत रहा व दिपक तायडेला जावून भेट'' असे सांगितले होते. सदर लाचमागणी प्रकारा बाबत तक्रारदार भुतेकर यांनी दि.१६.१०.२०२४ रोजी सापळा पथका समक्ष त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरात लिहुन दिली होती.

सदर लाचमागणी तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करणेकामी श्रेणी पोउपनि/दिनेशसिंग पाटील यांनी नविन मेमरीकार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार भुतेकर यांचे शर्टचे आत गळयात अडकावुन दिले. त्यानंतर १८.३२ वाजेचे सुमारास आम्ही तक्रारदार भुतेकर व पंच क्र.१ वाणी यांना तक्रारदार यांचेकडील मोटर सायकल क्र. MH 19 DA 1106 ने खाजगी इसम दिपक तायडे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे राहते घरी अहिरवाडी येथे रवाना केले होते. ते दोन्ही १९.११ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर श्रेणी पोउपनि/दिनेशसिंग पाटील यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार भुतेकर व पंच क्र.१ वाणी यांना विचारपुस करुन तसेच त्यांनी कथन केलेल्या हकिगती वरून तक्रारदार भुतेकर आणि खाजगी इसम दिपक तायडे यांचेमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन लाचमागणी संदर्भात खात्री केली असता तक्रारदार यांचे निलंबना संदर्भात खाजगी दिपक तायडे यांनी राजेंद्र सरदार, वनपाल यांचे मागणी प्रमाणे त्यांचे करिता स्वत:चे फोन पे वॉलेटवर तक्रारदार यांचे मित्र विकास गायकवाड यांचे फोन पे वॉलेटवरुन १३,२५०/— रुपये स्विकारल्याचे व त्यापैकी ३०० रुपयाचा रिचार्ज करुन उर्वरित पैसे ATM मधुन कॅश काढुन राजेंद्र सरदार, वनपाल यांना दिल्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले होते.

तसेच लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार भुतेकर व पंच क्र.१ वाणी यांचे समक्ष खाजगी इसम दिपक तायडे व राजेंद्र सरदार,वनपाल यांचेमध्ये फोन द्वारे तक्रारदार भुतेकर यांनी निलंबन टाळण्यासाठी दिलेल्या १३,२५०/—रुपयांबाबत चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान राजेंद्र सरदार,वनपाल यांनी खाजगी इसम दिपक तायडे यास खबरदारी घेण्याचा सल्ला देवुन ''तक्रारदार भुतेकर याच्याशी फोनवर काही बोलु नको, तु पैसे दिले किंवा नाही दिले याबाबत त्याला काहीच बोलु नको तो फोन रेकॉर्ड करतो'' असे सांगुन फोन कट केला. सदर संभाषणातुन राजेंद्र सरदार,वनपाल यांनी त्यांना खाजगी इसम दिपक तायडे याचेकडुन रोख १३,०००/—रुपये मिळाल्याचे मान्य केल्याची आमची व सापळा पथकाची खात्री झाली होती. परंतु राजेंद्र सरदार,वनपाल यांनी तक्रारदार भुतेकर यांना वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.बावणे यांचे नाव सांगुन लाचेची मागणी केली असल्याने सदर प्रकरणी त्यांची पडताळणी करण्याचे ठरवुन दि.१६.१०.२०२४ रोजी सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली होती. तसा सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दि.२९.१०.२०२४ रोजी तक्रारदार भुतेकर यांनी आम्हास फोन करुन ते श्री.बावणे वनपरिक्षेत्र अधिकारी, हे रावेर कार्यालयात येणार असल्याने त्यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याचे कळवले. त्याप्रमाणे १२.१५ वाजेचे सुमारास आम्ही,दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने ला.प्र.वि.जळगाव कार्यालयातुन रवाना होवुन १४.०० वाजेचे सुमारास शासकिय विश्रामगृह,रावेर येथे पोहचलो. तक्रारदार भुतेकर यांची भेट घेवुन त्यांना व पंचांना दि.१६.१०.२०२४ रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी सापळा स्थगीती कारवाई बाबत माहिती देवुन, प्रस्तुत लाचमागणी प्रकरणी श्री. बावणे, वन परिक्षेत्र अधिकारी यांची पडताळणी करण्याचे अनुषंगाने त्यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. श्रेणी पोउपनि/दिनेशसिंग पाटील यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार भुतेकर यांचे शर्टचे आत गळयात अडकावुन दिले. त्यानंतर १४.०८ वाजेचे सुमारास तक्रारदार व पंच क्र.१ वाणी यांना तक्रारदार यांचेकडील मोटर सायकल क्र. MH 19 DA 1106 ने श्री.बावणे वनपरिक्षेत्र अधिकारी,रावेर यांची भेट घेण्यासाठी वनक्षेत्र रावेर कार्यालयात रवाना केले.

त्यानंतर १४.२२ वाजेचे सुमारास तक्रारदार भुतेकर हे पंच नं.१ वाणी यांचेसह सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर श्रेणी पोउपनि/दिनेशसिंग पाटील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

त्यामधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन तसेच पंच नं.१ वाणी व तक्रारदार भुतेकर यांनी कथन केलेल्या हकिगतीवरून तक्रारदार भुतेकर हे श्री.बावणे वनपरिक्षेत्र अधिकारी यांना भेटण्यासाठी गेले होते. परंतु ते जळगावला गेले असल्याने त्यांची व तक्रारदार भुतेकर यांची भेट होवु शकली नाही बाबत सदर ठिकाणी उपस्थित कर्मचारी व तक्रारदार भुतेकर यांचेमध्ये झालेल्या संभाषणावरुन समजुन आले. आम्ही तक्रारदार भुतेकर यांना श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी हे जळगांव शहरात कोठे भेटतील? असे विचारले असता त्यांनी ते जळगांव शहरात आर.टी.ओ.ऑफीसचे बाजुस असलेल्या फॉरेस्ट कार्यालयात भेटतील असे सांगितले.

त्यामुळे पुढील सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही तक्रारदार भुतेकर यांना १६.३० वाजेचे सुमारास RTO ऑफिस जळगाव जवळील देशपांडे मोटार ड्रायव्हिंग स्कुल जवळ थांबण्यास सांगुन त्यांना त्यांचे खाजगी मोटर सायकलने रवाना केले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे सोबत आणलेल्या सरकारी वाहनाने शासकिय विश्रामगृह,रावेर येथुन रवाना होवुन १६.४० वाजेचे सुमारास तक्रारदार भुतेकर यांना सांगीतलेल्या ठिकाणी पोहचलो. त्यानंतर १७.१८ वाजेचे सुमारास आम्ही तक्रारदार भुतेकर यांचेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन त्यांना व पंच क्र.१ वाणी यांना तक्रारदार भुतेकर यांचे खाजगी मोटर सायकलने श्री.बावणे वनपरिक्षेत्र अधिकारी यांची भेट घेण्यासाठी RTO ऑफिस जळगाव जवळील देशपांडे मोटार ड्रायव्हिंग स्कुल येथुन फॉरेस्ट कार्यालयात रवाना केले. ते दोन्ही १७.३० वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आले. तक्रारदार भुतेकर यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून, त्यामधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन तसेच पंच नं.१ वाणी व तक्रारदार भुतेकर यांनी कथन केलेल्या हकिगतीवरून तक्रारदार भुतेकर हे श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी यांना भेटण्यासाठी गेले होते. परंतु ते कार्यालया बाहेरील निंबाचे झाडाजवळ असल्याचे तेथे उपस्थित कर्मचारी यांनी तक्रारदार भुतेकर यांना सांगीतले. त्याप्रमाणे तक्रारदार भुतेकर व पंच क्र.१ वाणी यांनी सदर कार्यालयाचे बाहेर येउन पाहिले असता त्यांना श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी हे दिसुन आले नाहीत. म्हणुन ते व पंच क्र.१ वाणी असे सापळा पथकाजवळ परत आले बाबत हकीकत कथन केली.

त्यानंतर तक्रारदार भुतेकर यांनी आम्हास त्यांना श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी हे त्यांच्या गाडीमध्ये बसुन फॉरेस्ट कार्यालयात जातांना दिसल्याचे सांगितले. तेव्हा श्रेणीपोउपनि/दिनेशसिंग पाटील यांनी १७.४५ वाजेचे सुमारास व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार भुतेकर यांचे गळयात शर्टचे आत अडकावुन दिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार भुतेकर व पंच क्र.१ वाणी यांना तक्रारदार भुतेकर यांचे कडील खाजगी मोटर सायकल क्र.MH 19 DA 1106 ने श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी यांची भेट घेण्यासाठी RTO ऑफिस जळगाव जवळील देशपांडे मोटार ड्रायव्हिंग स्कुल येथुन फॉरेस्ट कार्यालयात रवाना केले. त्यानंतर १८.०० वाजेचे सुमारास ते दोन्ही सापळा पथकाजवळ परत आले.तक्रारदार भुतेकर यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून, त्यामधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन, तसेच पंच नं.१ वाणी व तक्रारदार भुतेकर यांनी कथन केलेल्या हकिगतीवरून तक्रारदार भुतेकर व श्री.बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे मध्ये तक्रारदार भुतेकर यांचे निलंबनाचे कामा संदर्भात चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान तक्रारदार भुतेकर यांनी श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी यांना ''सरदार साहेबांनी तुमच्या नावाचा निरोप सांगीतला होता. आणि त्याच्याकडुन मला पैसे मागितले होते. मी पैसे सुध्दा दिले'' असे सांगीतले. तेव्हा त्यांनी ''ते मला काही माहित नाही काय विषय आहे ते, तुम्ही त्याचेवर जे नियमात बसत ती कारवाई करायला पाहीजे'' असे सांगीतले. सदर चर्चेअंती श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी स्वत: तक्रारदार भुतेकर यांचेकडे किंवा वनपाल श्री.सरदार यांचे मार्फतीने लाचरक्कम मागीतल्याचे निष्पन्न झाले नाही. त्यामुळे दि.२९.१०.२०२४ रोजीची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली होती. तसा सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.०५.११.२०२४ रोजी सदर लाचमागणी प्रकाराबाबत आम्ही तक्रारदार रमेश भुतेकर व त्यांचा मित्र विकास गायकवाड यांचे जबाब नोंद केले आहेत. दि.१६.१०.२०२५ रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार भुतेकर यांचे जिन्सी कार्यक्षेत्रातील रोपवना मध्ये झालेल्या निंदणी कामाचा तपासणी अहवाल मॅनेज करुन, त्यांचे निलंबन होवु न देण्याचे, मोबदल्यात व त्यांना निलंबनातून मुक्त करण्यासाठी वरिष्ठांना सांगून प्रयत्न करतो असे सांगुन राजेंद्र सरदार, वनपाल यांनी खाजगी ईसम दिपक तायडे याचे कडुन १३,०००/—रुपये रोख मिळाल्याचे मान्य केले होते. तसेच खाजगी इसम दिपक तायडे याने राजेंद्र सरदार, वनपाल यांचेकरिता तक्रारदार भुतेकर यांचा मित्र विकास गायकवाड याचे फोन पे वरुन १३,२५०/—रुपये प्राप्त झाल्याचे व त्यापैकी १३,०००/—रुपये याने राजेंद्र सरदार, वनपाल यांना ATM मधुन काढुन त्यांना दिल्याचे मान्य केले होते. तसेच तक्रारदार

भुतेकर यांचा मित्र विकास गायकवाड यांचा जबाब नोंद केला असता त्यांना तक्रारदार भुतेकर यांनी योनो ॲपद्वारे पाठवलेले १३,२५०/—रुपये त्यांचे सांगणे प्रमाणे त्यांनी खाजगी इसम दिपक तायडे याचे फोन पे वर पाठवल्याचे व त्याचा स्क्रिनशॉट तक्रारदार भुतेकर यांना पाठवल्याचे मान्य केले होते. तसे त्यांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात आले आहे.

सदर लाचमागणी प्रकारा संदर्भात जा.क्र.२१८८,दि.१२.१२.२०२४ रोजी आम्ही मा.पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक यांना लोकसेवक श्री.राजेंद्र सरदार,वनपाल यांनी तक्रारदार भुतेकर त्यांचेकडे वर प्रमाणे मागणी केलेल्या व त्यांचे करिता खाजगी इसम दिपक तायडे याने स्वत:चे फोन पे वर तक्रारदार यांचा मित्र विकास गायकवाड यांचे फोन पे वरुन स्विकारलेल्या १३,२००/—रुपये लाच रक्कमेच्या अनुषंगाने लाचमागणीचा गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळणे संदर्भात सविस्तर अहवाल सादर केला होता. तसेच सदर कार्यालयाकडुन विधी अधिकारी,लाचलुचपत प्रतिबंध विभाग, पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांना अभिप्राय मिळणेकामी सविस्तर अहवाल सादर केला होता. सदर अवालाचे अनुषंगाने प्रस्तुत लाचमागणी प्रकरणी लोकसेवक श्री.राजेंद्र सरदार,वनपाल व खाजगी इसम दिपक तायडे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करणे बाबत अभिप्राय दिला होता. सदर अभिप्रायाचे अनुषंगाने जा.क्र.लाप्रवि/मुख्या/वाचक/नाशिक, परि/डी/१३५/जळगाव/२०२५/०६/२०२६,दि.०१.०१.२०२६ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७ अ, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याचे परवानगी देण्यात आली आहे.

तरी दि.१६.१०.२०२४ रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री.राजेंद्र अमृत सरदार, वनपाल,अहिरवाडी वनक्षेत्र रावेर,जि.जळगाव यांनी वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन, तक्रारदार श्री.रमेश अरुण भुतेकर, तत्कालीन नेमणुक वनरक्षक जिन्सी वनक्षेत्र, रावेर,यावल वनविभाग, जळगाव रा.गोपाल नगर,स्टेशन रोड, रावेर,जि.जळगांव यांना त्यांचे जिन्सी कार्यक्षेत्रातील रोपवनामध्ये निंदणी कामाचा तपासणी अहवाल मॅनेज करुन त्यांचे निलंबन होवु न देण्याचे मोबदल्यात तसेच तक्रारदार भुतेकर यांचे निलंबन झाल्यानंतर त्यांना निलंबनातून मुक्त करण्यासाठी वरिष्ठांना सांगून प्रयत्न करतो असा तक्रारदार भुतेकर यांचेवर वैयक्तीक प्रभाव पाडुन, श्री.बावणे,वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर यांना १५,०००/—रुपये द्यावे लागतील असे सांगुन, स्वत:साठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने लाच रक्कम मिळवण्याची व्यवस्था करुन, सदर लाच रक्कम खाजगी इसम दिपक रघुनाथ तायडे,रा.अहिरवाडी,ता. रावेर,जि.जळगाव यांचे फोन पे वर पाठवण्यास सांगुन, दि.०८.०९.२०२४ रोजी तक्रारदार भुतेकर यांचेकडुन १,७५०/—रुपये रोख स्विकारले. तसेच त्यांचे सांगणे प्रमाणे दि.०७.०९.२०२४ रोजी खाजगी इसम दिपक तायडे याने १५,०००/—रुपये लाच रक्कमेपैकी १३,२५०/—रुपये लाच रक्कम स्वत:चे फोन पे वर स्विकारुन, त्यापैकी त्यांना १३,०००/—रुपये लाच रक्कम ATM मधुन काढुन देवुन, लाच रक्कम स्विकारण्यासाठी मदत केली. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७ अ, १२ प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
रावेर पो.स्टे

ही फिर्याद दिली सही
दि.२०/०१/२०२६

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** रावेर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0022 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/01/2026 16:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 16/10/2024
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/10/2024
**Time From (वेळेपासून):** 18:32 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/01/2026 **Time (वेळ):** 15:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/01/2026 15:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** आ क्र 02 चे घरी, अहिरवाडी ,रावेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश गंगाधर ठाकूर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जळगाव,जळगाव,रावेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जळगाव,जळगाव,रावेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9702433131

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | .राजेंद्र अमत सरदार | | | 1. वनपरीक्षेत्र कार्यालय रावेर,रावेर, रावेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिपक रघुनाथ तायडे | | | 1. अहिरवाडी,रावेर,रावेर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील मुळ तक्रारदार हे धिरज प्रकाश बोदडे वय.20वर्षे धंदा.मजुरी रा. नविन अजनाड ता.रावेर जि.जळगांव हे दिनांक-10/12/2025 रोजी खानापुर येथील सरकार मान्य देशी दारुचे दुकान या ठिकाणी गेले होते त्यावेळी आलोसे विजय पाटील व भास्कर चंदनकर (खाजगी ईसम) यांची भेट झाली होती त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की या पुर्वी तुझे वडिल प्रकाश बोदडे यांच्या वर दारु विक्रीची केस आहे अजुन दारुबंदी कायद्याचे कलम 93प्रमाणे कारवाई करणार आहे. त्यावेळी तक्रारदार यांनी त्याना परत कारवाई करुनका अशी विनंती केले असता त्यावेळी दारुबंदी कायद्याचे कलम 93 प्रमाणे कारवाई न करण्या करता आलोसे विजय पाटील यांनी 12000/- रुपये मला द्यावे लागतील असे सांगीतले परंतु तक्रारदार यांनी आमचा धंदा चालु नसल्याने माझे कडे पैसे नाहीत असे त्याना सांगीतले होते त्यावेळी त्यानी तक्रारदार यांना 08 दिवसाची मुदत दिली होती त्यानंतर तक्रारदार यांनी आरोपीनी 12000/- रुपये लाचेची मागणी केल्याबाबत दिनांक-17/12/2025 रोजी जळगांव लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे सापळा पथकाकडे दोन पंचासमंक्ष तक्रार लिहुन दिली होती

सदर तक्रारीची पडताळणी केली असता श्री विजय पाटील दुय्यम निरीक्षक व चालक भास्कर चंदनकर यांनी तक्रारदार धिरज बोदडे यांचे कडेस त्याचे वडील प्रकाश बोदडे यांचे वर दारुबंदी कायद्याचे कलम 93प्रमाणे कारवाई न करण्याचे मोबदल्यात तसेच दारुचा धंदा यापुढे ही चालु ठेवायचा असल्यास 1500/- रुपये प्रती महिना प्रमाणे 12 महिन्याचे एकुण 18000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हपत्ता म्हणुन 10000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन सदरची लाच रक्कम चालक भास्कर चंदनकर यांनी तक्रारदार यांच्या कडुन पंचासमक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा सोबत टंकलिखीत फिर्याद जोडलेली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VISHAL PRABHULAL JAISWAL(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

dapvpim7702

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

20/1/26

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
रावेर पो.स्टे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VISHAL PRABHULAL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): dgpvpjm7702